# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ३४४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२०/०६/२०१६.

**१) विनयभंग करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली. :—**

दिनांक २०/०६/२०१६ रोजी ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी विवाहित महिला ही तीच्या पतीसोबत घरी हजर असतांना आरोपीने इलेक्ट्रीक बिलाचे पैसे व शेतीचे हिस्से मागण्याच्या कारणावरुन आपले घरुन हातात काठी घेवुन फिर्यादीचे घरात प्रवेश केला व फिर्यादीच्या पतीला काही न बोलता काठीने मारपीट करीत होता. यावरून फिर्यादी ही सोडविण्यास गेली तर तिला सुध्दा काठीने पाठीवर मारुन तीचे केस पकडुन थापडबुक्यानी मारुन फिर्यादीचा विनयभंग केला व लज्जास्पद वाटेल अशा अश्लील शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपार्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४५२,३५४(ब), ३२३,५०४,५०६,५०९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. परतेकी पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शेरेबाजी व अश्लिल हावभाव करून विनयभंग केला व जिवाने मारण्याची धमकी दिली. :—**

दिनांक १७/०६/०१६ रोजी २०.३० वा. दरम्यान आरोपी हा फिर्यादी विवाहित महिलेच्या घरी जावुन फिर्यादीला ''तु आमचा रोडवर लावलेला बॅनर सुतळी कापुन का तोडला.'' असे म्हणुन अश्लिल शब्दात शेरेबाजी केली व अश्लिल हावभाव करून फिर्यादीचा विनयभंग केला व जिवाने मारण्या पिटण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४५१,३५४(अ)(४),५०६,५०९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनि. आडे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) जनावरांना कोंबुन अवैधरित्या वाहतुक करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक १९/०६/०१६ रोजी २१.३० वा. दरम्यान पिकअप बोलेरो गाडी क्र. एमएच ४० वाय ४१५८ च्या आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील वाहनात ३ गाय, ३ गोरे लहान मोठे अंदाजे ३०,०००/—रु. चे जनावरे कोंडुन निर्दयतेने वागणुक देवुन बैल बाजार भंडारा साईमंदिर रोड येथुन नेतांना मिळुन आले. असे फिर्यादी शिवा कैलासराव भंडारी वय २० वर्ष, रा. तिलक वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ११(ड) प्रा.नि.वा.का. सहकलम ९ प्रा.सं.का. सहकलम ८३/१९२ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. चोपकर पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) दारूडया वाहन चालकावर कारवाई. :—**

दिनांक २०/०६/०१६ रोजी १७.४० ते १८.१० वा. दरम्यान आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ४० एल ७५८९ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूच्या नशेत जि.प. चौक भंडारा येथे चालवितांना मिळुन आला. त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आले. असे सर तर्फे फिर्यादि पोहवा. हटवार वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. घरडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) गळफास लावुन मृत्यु. :—**

दिनांक २०/०६/०१६ रोजी ०४.०० ते ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी विनोद रघुनाथ बांडेबुचे वय २४ वर्ष, रा. भिलेवाडा यांचा संतोष रतीराम मते वय ३० वर्ष, रा. भिलेवाडा हा भाटवा लागत असुन तो ट्रक ड्रायव्हर म्हणुन काम करित होता. तो दि. २०/०६/१६ रोजी ०४.०० वा. ट्रक घेवुन आला व ०६.०० वा. दरम्यान घरी छपरीच्या बासाला साडीने गळफास लावुन मरण पावलेला दिसला. त्याला डोक्याचा त्रास होता त्या त्रासामुळे किंवा परिस्थीतीला कंटाळुन त्याने गळफास लावुन आत्महत्या केली. असे फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. चौकशी पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**६) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक २०/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १८२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा—यांवर ०७ केसस, तिन सिटर वाहनांवरती १८ केसेस व इतर वाहनांवरती १५७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.